लोकमत

# विद्यापीठात संत जगनाडे जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संत संताजी जगनाडे यांची जयंती शिवाजी विद्यापीठात बुधवारी साजरी करण्यात आली. संत तुकाराम महाराज यांचे शिष्य असलेले आणि त्यांचे टाळकरी व लेखनिक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेल्या संत संताजी जगनाडे यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. आर. व्ही. गुरव, मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे, आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठाकडून परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या हिवाळी सत्रातील परीक्षांचे अर्ज भरण्यास दि. १४ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या मुदतीपर्यंत विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये अर्ज भरावयाचे आहेत.

कला, वाणिज्य, विज्ञान, सर्व पदविका, प्रमाणपत्र, बी. व्होक आणि इतर सर्व पारंपरिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज महाविद्यालय अथवा पदव्युत्तर अधिविभागामध्ये भरण्याची अंतिम मुदत दि. ७ डिसेंबरपर्यंत होती. मात्र, एसटी कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या संपामुळे काही विद्यार्थ्यांना या मुदतीमध्ये अर्ज भरता आलेले नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी परीक्षा अर्ज भरण्यासाठी विद्यापीठाने मुदतवाढ दिली आहे.

महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये परीक्षा अर्जाच्या याद्या दि. १६ डिसेंबरपर्यंत सादर करावयाच्या आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी बुधवारी दिली.

0 9 DEC 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर ही वीरभूमी : बिपीन रावत यांच्या आठवणींना उजाळा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

कोल्हापूर ही वीरभूमी आहे, ज्या गावातील प्रत्येक घरातील एक व्यक्ती सैन्यदलात आहे अशा जिल्ह्यातील सैनिक टाकळी गावचा मला अभिमान आहे, असे गौरवोद्‌गार तत्कालीन लष्करप्रमुख बिपीन रावत यांनी काढले होते. १०९ मराठा लाईट इन्फंट्री टी. ए. बटालियनचा रोमांचकारी इतिहास असून, या बटालियनला सैन्यात मानाचे स्थान असल्याचे रावत यांनी सांगितले होते. टी. ए. बटालियनच्या १०९ मराठा लाईट इन्फंट्री (टी.ए) च्या वतीने कोल्हापुरात आयोजित माजी सैनिकांच्या महारॅलीस उपस्थित राहण्यासाठी दि. ३१ नोव्हेंबर २०१८ रोजी रावत पत्नी मधुलिका रावत यांच्यासह कोल्हापुरात आले होते. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच त्यांच्या आठवणींना उजाळा मिळाला.

या कार्यक्रमास शाहू महाराज, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, 'पुढारी'चे समूह संपादक डॉ. योगेश जाधव, खा. संभाजीराजे, मराठा लाईट इन्फंट्रीचे लेफ्टनंट जनरल पी. जे. एस. पन्नू प्रमुख उपस्थित होते.

कोल्हापुरात प्रथमच आलेल्या बिपीन रावत यांनी कोल्हापूरविषयी आपल्याला विशेष प्रेम असल्याचे तेव्हा माध्यमांशी बोलताना सांगितले. देशातील अनेक राज्यांत व गावांमध्ये आपण फिरत असतो; पण कोल्हापूर जिल्ह्यातील सैनिक टाकळी या गावाचा अभिमान असल्याचे सांगत रावत म्हणाले, या गावातील अशी अनेक घरे आहेत यातील कोणीतरी सैन्यात आहे किंवा होते. यामुळे ही वीरभूमी आहे आणि अशा वीरभूमीत येणे हे माझे भाग्य आहे.

मराठा लाईट इन्फंट्रीचे काम सैन्यासाठी आदर्शवत आहे. छत्रपती शिवरायांच्या विचारांवर चालणारी ही बटालियन आहे. शत्रूलाही भीती वाटावी, असा या बटालियनचा दरारा आहे. कोणत्याही ठिकाणी, कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही आव्हानांचा सामना करण्यासाठी तैनात केले तरी ही बटालियन विजयी होऊनच परतणार एवढी क्षमता असणारी ही बटालियन आहे. मराठा बटालियनच्या जवानांपुढे शत्रूचाही थरकाप उडतो, असे त्यांनी म्हटले होते.

### तुम्ही कुठे राहता?

कोल्हापुरात पत्नी मधुलिका रावत यांच्यासोबत माजी सैनिकांच्या महारॅलीत सहभागी होण्यासाठी बिपीन रावत आले होते. या कार्यक्रमात वीरपत्नी, वीरमाता यांच्याशी हितगुज करत त्यांनी उपस्थितांची मने जिंकली होती. प्रत्येक वीरमातेला तुमचे नाव काय, तुम्ही कोणत्या गावातून आला, तुम्हाला ज्या सुविधा देण्यात येतात त्या मिळतात का? तुम्ही खूश आहात का, अशी विचारणा करत माजी सैनिक व त्यांच्या परिवाराशी अपुलकीचे नाते निर्माण केले. आपल्या पदाचा कोणताही गर्व न बाळगता रावत यांच्या आपलेपणाचे माजी सैनिकांनीही कौतुक केले.



कोल्हापूर : १०९ इन्फंट्री बटालियनतर्फे २०१८ मध्ये आयोजित कार्यक्रमात तत्कालीन लष्करप्रमुख जनरल बिपीन रावत दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांच्याशी हस्तांदोलन करताना. शेजारी शाहू महाराज, खा. संभाजीराजे, शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.

पुण्यनगरी

# हेल्पर्सतर्फे जागतिक अपंग दिन साजरा

**कोल्हापूर :** हेल्पर्स संस्थेच्या वतीने जागतिक अपंग दिनानिमित्त रविवारी संस्थेच्या घरोंदा वसतिगृहात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मान्यवरांच्या उपस्थितीत सोनाली नवांगुळ यांना भरारी पुरस्काराने, तर प्रा. अनिता दांडेकर यांना अपंगमित्र पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी समर्थ विद्यालयातील २६ गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. अध्यक्षस्थानी नाबार्डचे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात होते. प्रमुख उपस्थिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची होती. स्वागत प्रमोद देशपांडे यांनी केले. यावेळी गुणवंत कर्मचारी दीपक कुशाप्पा पोवार यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला प्राचार्य राजेंद्र लोखंडे, प्राचार्य प्रमोद म्हांगोरे, रेखा देसाई, मालूताई काळे, विश्वास सुतार, विठ्ठल कोतेकर आदी उपस्थित होते.

0 9 DEC 2021
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रोप मल्लखांब स्पर्धेत 'शिवराज 'ला विजेतेपद

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

येथील शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या वतीने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय रोप मल्लखांब स्पर्धेत शिवराज महाविद्यालयाच्या समीक्षा गावडे, सुकन्या रणदिवे, प्रणाली सलगडे, वृषाली जाधव, शुभांगी पाटील, अनुजा धबाले या मुलींच्या संघाने सांघिक गटात १५ गुण मिळवून विजेतेपद पटकावले, तर आजरा महाविद्यालयाच्या सानिका बिरंजे, सानिका पाटील, साक्षी पाटील, मीनाक्षी पाटील, सपना कांबळे या मुलींच्या संघाने सांघिक गटात ८ गुण मिळवून उपविजेता ठरला. येथील घाळी महाविद्यालयाच्या संघाने तृतीय क्रमांक पटकावला.



**गडहिंग्लज : रोप मल्लखांब स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिक वितरणप्रसंगी रमेश रिंगणे, पी. टी. गायकवाड, अनिल कुराडे यांच्यासह अन्य.**

विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. रमेश रिंगणे, पी. टी. गायकवाड, ॲड. सतीश ईटी, राजू मोळदी, नारायण कुराडे, सचिव अनिल कुराडे, बसवराज आजरी, प्राचार्य एस. एम. कदम, आण्णा पाटील, सी. एस. गिरी, एस. टी. मगदूम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

मल्लखांब सांघिक (मुले) गटात यशवंतराव चव्हाण वारणा कॉलेज वारणानगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज पेठवडगाव, शिवराज कॉलेज गडहिंग्लज. वैयक्तिक मुले गटात शुभम लगडे (वाय. सी. कॉलेज वारणानगर), कुणाल दरवान (विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर), रवींद्र पाटील (छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा). मुली रोप मल्लखांब- पल्लवी शिंदे (किसनवीर कॉलेज, वाई), पल्लवी मोरे (डी. जी. पाटील कॉलेज, सातारा), सिद्धी चव्हाण (किसनवीर कॉलेज, वाई). स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी राहुल मगदूम, जयवंत पाटील, रतन जाधव यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

# आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धा सुरू

इचलकरंजी, ता. ८ : जयहिंद मंडळ येथे आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेला प्रारंभ झाला. नाईट कॉलेज इचलकरंजी व एलबीएस कॉलेज सातारा यांच्यामध्ये सलामीचा सामना झाला. नाईटक कॉलेजने निर्विवाद वर्चस्व राखत ४० वि. १९ अशा २१ गुणांच्या फरकाने सामना जिंकून विजयी सलामी दिली. राहुल खंजिरे, प्रकाश रावळ यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन झाले. प्राचार्य डॉ. पुरंदर नारे यांनी स्वागत केले. मोठ्या प्रमाणात कबड्डी स्पर्धा भरवण्याचा मान नाईट कॉलेजला मिळाला. इचलकरंजीची कबड्डी परंपरा मोठी असून, स्वतः कबड्डी खेळाडू असल्याचा अभिमान आहे. राजकारण आणि मैदानातून तयार झालेला राजकारणी यांच्यामध्ये खूप फरक असतो, असे श्री. खंजिरे यांनी सांगितले.

प्रथम सत्रात शाहू कॉलेज, एसजीएम कॉलेज कऱ्हाड, केबीपी कॉलेज इस्लामपूर आदी संघांनी एकतर्फी विजय मिळविला. द्वितीय सत्रात अनेक महाविद्यालयांनी उत्कृष्ट कामगिरी करत विजय मिळविला. गुरुवारी (ता.९) दोन्ही सत्रात सामने खेळवणारे जाणार असून, सायंकाळी सहा वाजता स्पर्धेचा पारितोषिक वितरण होणार आहे. जयहिंद मंडळाचे अध्यक्ष सत्यनारायण डाळ्या, जिल्हा कबड्डी असोसिएशनचे सचिव संभाजी पाटील, कार्याध्यक्ष रमेश भेंडीगिरे, शेखर पाटील आदी उपस्थित होते. देवेंद्र बिरनाळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आर. व्ही. सपकाळ यांनी आभार मानले. प्रा. मिलिंद दांडेकर यांनी सूत्रसंचालन केले.



**इचलकरंजी : आंतरविद्यापीठ कबड्डी स्पर्धेत पहिल्या दिवशी नाईट कॉलेज इचलकरंजी व एलबीएस कॉलेज सातारा यांच्यामध्ये सलामीचा सामना झाला.**

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. एस. टी. कर्मचाऱ्यांच्या संपामुळे अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता आला नाही. याची दखल घेत विद्यार्थी हितासाठी यापुर्वी ७ डिसेंबरपर्यंत अर्ज भरण्यास मुदत होती. ती वाढवून विनाविलंब शुल्कासह १४ डिसेंबरपर्यंत विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरायचा आहे. तर महाविद्यालयांनी परीक्षा अर्जाच्या याद्या विनाविलंब शुल्कासह १६ डिसेंबरपर्यंत विद्यापीठाला सादर करायच्या आहेत. महाविद्यालय अथवा पदव्युत्तर विभागाने १५ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन परीक्षा अर्ज भरावयाचा आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक निवास माने यांनी दिली.